# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८७ वी बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१४

## ठराव

मा. ना. शशिकांत शिंदे, मंत्री, जलसंपदा (कृखोपामं) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ८७ वी बैठक बुधवार दि. १३ ऑगस्ट २०१४ रोजी मा. उपमुख्यमंत्री महोदय यांचे समिती कक्ष, तळ मजला, विधानभवन, मुंबई-३२ येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व निमंत्रित अधिकारी उपस्थित होते.

**सन्माननीय सदस्य**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. शशिकांत शिंदे | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. वल्लभ बेनके | ... | विधानसभा सदस्य तथा उपाध्यक्ष |
| ३. | इंजि. ए. बा. पाटील | ... | प्रधान सचिव (ज.प्र.व वि.) व सदस्य |
| ४. | श्रीमती मालिनी शंकर | ... | प्रधान सचिव (जव्य व लावि) व सदस्य |
| ५. | इंजि. शि.मा. उपासे | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. अविनाश सुर्वे | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. पं. छ. घोलप | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे (अ.का.) |

बैठकीच्या सुरुवातीस कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

"मान्य"

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
# नियामक मंडळाची ८७ वी बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१४

## ठराव

**ठराव क्र. ८७/१**

**ठराव करण्यात येतो की, दिनांक ०३/०६/२०१४ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८४ व्या बैठकीत पारीत केलेल्या ठरावांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे."**

**ठराव क्रमांक ८७/२**

**"ठराव करण्यात येतो की, दि. २३/०७/२०१४ रोजी संपन्न झालेल्या नियामक मंडळाच्या ८६व्या बैठकीत पारित करण्यात आलेले ठराव खालीलप्रमाणे कायम करण्यात येत आहेत."**

ठराव क्र. ८६/३

"ठराव करण्यात येतो की, कृष्णा प्रकल्पांतर्गत धोम धरणाचे बांधकामासाठी संपादित केलेल्या जमिनीपैकी २६.७६ हे. इतकी अतिरिक्त व विनावापर असलेली जमिन प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसनासाठी पर्यायी जमिन म्हणून वाटप करण्यासाठी जिल्हाधिकारी सातारा यांचेकडे वर्ग करणे करता खालील अटीनुसार नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

अट : सदरची जमिन खाचखळग्यांची आहे व डोंगर उतारावरील आहे. तसेच ती धोम प्रकल्पाच्या लाभक्षेत्रा बाहेर असल्याने त्यासाठी पाण्याची सुविधा अस्तित्वात नाही. त्यामुळे महामंडळाकडून या जमिनीला पाणी देण्याची व्यवस्था होऊ शकणार नाही."

ठराव क्र. ८६/४

"ठराव करण्यांत येतो की, ॲड श्री. ज्ञा.द. शिंदे, यांना महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे 'कायदे सल्लागार' म्हणून दि. ०१-०९-२०१४ ते ३१-०८-२०१५ या कालावधीसाठी खालील अटींनुसार मुदतवाढ देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

(अ) दरमहा रु.३०,०००/- (रुपये तीस हजार फक्त) इतके मानधन व दिल्ली, मुंबई येथील दौऱ्यांसाठी रुपये ५००/- दर दिवशी व इतर ठिकाणी रुपये ३००/- दर दिवशी एवढा दैनिक भत्ता देय राहील.

(ब) महामंडळ कार्यालयात कामासाठी उपस्थित राहतील त्यावेळी बसण्याची सुयोग्य व्यवस्था करण्यांत येईल.

(क) महामंडळ कार्यालयात जाणे-येणेसाठी वाहन भत्ता म्हणून प्रतिमाह रु.५०००/- इतकी ठोक रक्कम देय असेल.

(ड) प्रत्येक आठवडयातील दर मंगळवारी व शुक्रवारी (सार्वजनिक सुट्टी वगळता) कायदेविषयक सल्ला देणेसाठी महामंडळ कार्यालयात उपस्थित रहावे लागेल. तातडीचे प्रकरणासाठी इतर दिवशी कायदेविषयक सल्ला घ्यावयाचा असल्यास कायदे सल्लागार यांचे निवासस्थानी दूरध्वनीवरुन वेळ ठरवून त्याप्रमाणे सल्ला घेण्यांत येईल.

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

**महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११**
**नियामक मंडळाची ८७ वी बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१४**

(इ) कायदेशीर बाबी तपासून महामंडळाचे / शासनाचे हित सर्व प्राथम्याने जपले जाईल, या दृष्टीने कायदे सल्लागार यांनी सल्ला देणे अपेक्षित राहील.

ठराव क्र. ८६/५

"ठराव करण्यात येतो की, टेंभू उपसा सिंचन योजनेच्या टप्पा क्र. ३ येथील २२० के.व्ही. कळयंत्र आवारातील उपकरणे / सुट्टया भागांचा पुरवठा अंदाजे १२ वर्षापूर्वी झालेला असून तात्कालीक नियोजनानुसार प्रकल्पास अपेक्षित निधी उपलब्ध न झाल्यामुळे कळयंत्र आवारातील उपकरणांची उभारणी पूर्ण होऊ शकलेली नाही. गेल्या १२ वर्षातील हवामानाचा परिणाम व कालावधी व्यय झाल्यामुळे काही उपकरणे व त्यांचे सुट्टे भाग खराब झाले आहेत. टेंभू उपसा सिंचन योजनेचा टप्पा क्र. ३ पुर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी या उपकरणांचे सदर पार्टस बदलणे, उपकरणांचे ओव्हर हॉलींग करणे, ऑईल फिल्टरेशन करणे, उपकरणांची चाचणी घेणे व Refurbishment करणे अत्यंत आवश्यक आहे. यामुळे या कामासाठीच्या (Refurbishment) अंदाजे रु. ७३ लक्षच्या खर्चास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ८६/६

"ठराव करण्यात येतो की, दुसऱ्या कृष्णा पाणी तंटा लवादानुसार राज्यास अतिरीक्त पाणी उपलब्ध झाल्यास व त्यानुसार नवीन धरण /जलाशय बांधून त्यातुन टेंभू प्रकल्पास अतिरिक्त पाणी उपलब्ध झाल्यास, मा.राज्यपाल महोदयांच्या प्रचलीत निर्देशानुसार वंचित राहिलेल्या खटाव तालुक्यातील कलेढोणसह १४ गावांना टेंभू योजनेतून सिंचनासाठी प्राथम्याने पाणी उपलब्ध करुन देण्यासाठीचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची तत्वत: मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ८६/७

"ठराव करण्यात येतो की, पुरंदर उपसा सिंचन योजनेच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर केलेल्या सुधारित प्रकल्प अहवालातील समाविष्ठ लाभक्षेत्र २५४९८ हेक्टर (ICA) व ६३ गांवे यात बदल न करता प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात अंतर्भूत झालेले ल.पा. प्रकल्पाचे व नाझरे मध्यम प्रकल्पाच्या जलाशयावरील उपसा सिंचन योजनांचे सरमिसळ/आच्छादित (Overlap) होणारे ९०० हेक्टर लाभक्षेत्र वगळून त्याऐवजी पुरंदर तालुक्यातील मौजे कोळविहिरे, नावळी व मावडी क.प. या गावातील ९०० हेक्टर क्षेत्र प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात समाविष्ट करण्याची शिफारस शासनास करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ८६/८

ठराव करण्यात येतो की, टेमघर धरणातून होणारी गळती कमी करण्यासाठी व धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक तांत्रिक उपाय योजना अंतिम करणे तसेच उपाय योजनेनुसार काम चालू असताना भेटी देऊन मार्गदर्शन करणे व गळती प्रतिबंधात्मक उपाययोजनेनुसार कामे पूर्ण झाल्यानंतर परिणाम तपासणे यासाठी तज्ञ समितीच्या नेमणूकीस खालीलप्रमाणे नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

"मान्य"

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८७ वी बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१४

समितीची रचना :

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.वि.म.रानडे,<br>सचिव (से.नि.), जलसंपदा विभाग | ... | अध्यक्ष |
| २. | महासंचालक, मेरी नाशिक | ... | सदस्य |
| ३. | अधीक्षक अभियंता,(दध) म.सं.सं. नाशिक | ... | सदस्य |
| ४. | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे | ... | सदस्य |
| ५. | केंद्रीय जल व विद्युत संशोधन संस्था,पुणे यांनी निर्देशित केलेले प्रतिनिधी | ... | सदस्य |
| ६. | केंद्रीय जल आयोग, नवी दिल्ली यांनी सुचविलेले या विषयातील तज्ञ / सेवानिवृत्त अधिकारी | ... | सदस्य |
| ७. | अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ, पुणे | ... | सदस्य सचिव |

(ब) समितीची कार्यकक्षा :

1. To review present status of Temghar dam from Safe point of view including structural stability of dam.
2. Review of instrumentation and data analysis.
3. Identification of problems –
   i) Quantitative & qualitative analysis
   ii) Gallery wise
   iii) Monolith wise
   iv) Level wise
4. Ascertaining causes for seepage through dam body through investigation, collection and interpretation of available data and through additional data and investigations, if required.
5. Recommendations for immediate and short term remedial measures
6. Recommendations for permanent and long term remedial measures
7. Recommendations for future safety measures.

(क) कालावधी : समिती आपला अहवाल सहा महिन्याच्या कालावधीत महामंडळास सादर करेल.

(ड) भत्ते : राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या समिती सदस्यांना प्रचलित शासन नियमाप्रमाणे प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय असेल. तदनुषंगिक खर्च ते कार्यरत असलेल्या कार्यालयाकडील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात येईल. केंद्र शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या समिती सदस्यांचा प्रवास खर्च व दैनिक भत्याचा खर्च त्यांना केंद्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार अनुज्ञेय असल्याप्रमाणे महामंडळाकडील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात येईल.

(इ) मानधन : राज्य/केंद्र शासनाच्या सेवेत कार्यरत नसलेल्या सदस्यांना बैठकीच्या कामकाजाच्या प्रत्येक दिवसाकरिता रुपये ७५००/- (रुपये सात हजार पाचशे फक्त) इतके मानधन अनुज्ञेय राहील. यात प्रत्यक्ष

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

प्रवासाकरिता लागलेल्या दिवसांचाही समावेश करण्यात येईल. प्रत्येक सदस्यांचे निवासस्थान हे त्यांचे मुख्यालय म्हणून गृहित धरण्यात येईल. प्रत्येक सभासद स्वत: प्रमाणित केलेली कामकाजाची दैनंदिनी (डायरी) ठेवतील व त्याआधारे मानधनाची रक्कम निश्चित करुन कार्यकारी अभियंता, भामा आसखेड धरण विभाग, पुणे यांचेकडून अदा करण्यात येईल. या करिता महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून उपलब्ध अनुदानातून आवश्यक तरतूद करण्यात येईल.

ठराव क्र. ८६/९

"ठराव करण्यात येतो की, चित्री मध्यम प्रकल्पाच्या जलाशयास "चित्रीकार श्री. बाबासाहेब कुपेकर जलाशय" असे नांव देण्याचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ८७/३**

**"ठराव करण्यात येतो की, कण्हेर प्रकल्पांतर्गत मौजे वेळे (वेणेगाव) ता. जि. सातारा येथील पुनर्वसित गावठाणात वाटप केलेल्या भूखंडावर, श्री. पांडुरंग श्रीरंग शिंदे व श्री. शिवाजी श्रीपती जाधव यांनी घरे बांधल्यानंतर ही जमिन संपादनातून वगळल्याने त्या घरांची नुकसान भरपाई देण्याबाबतचा प्रश्न उपस्थित झाला आहे. या अनुषंगाने या विषया बाबतची सखोल चौकशी करुन संबंधितांना नुकसान भरपाई देण्याबाबतचा निर्णय महसूल खात्याने त्यांच्या स्तरावर घ्यावा."**

**ठराव क्रमांक ८७/४**

**"ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या ताब्यातील मौजे तरंगफळ ता. माळशिरस जि. सोलापूर येथील स.नं. १५ लगत नीरा उजवा कालव्याच्या कि.मी. १२६ साठी संपादित केलेल्या जागेपैकी, २ आर विनावापर जागा (अ) चालू मूल्यांकनानुसार होणारी किंमत महामंडळास अदा करण्याच्या अटीच्या आधीन राहून, तसेच (ब) कालव्यावरुन पिण्याच्या पाण्यासाठी आवश्यक असणारा पाणी परवाना अर्जदार संस्थेने जलसंपदा विभागाकडून (महामंडळाकडून) घेण्याचे अटींच्या अधिन राहून जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे वर्ग करुन त्यांचेमार्फत ग्रामपंचायत तरंगफळ ता. माळशिरस यांना खालील नमूद केलेल्या अटींवर कायमस्वरुपी देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."**

**अटी :**

**१. ग्रामपंचायत तरंगफळ यांनी सदर जागा जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडून प्राप्त करुन घेण्यापूर्वी त्या जागेचे विहित नियमानुसार येणारे मूल्य महामंडळास आगाऊ अदा करावे.**

**२. सदर जागा ज्या उद्देशासाठी देण्यात आली आहे त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी वापरण्यात येऊ नये.**

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८७ वी बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१४

**ठराव क्रमांक ८७/५**

"ठराव करण्यात येतो की, महामंडळांतर्गत धरणे / पंपगृहे / स्विचयार्डस / महत्वाची कार्यालये / वसाहती यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाच्या आस्थापनेवरील चौकीदार उपलब्ध नसल्यास खाजगी सुरक्षा यंत्रणा वापरण्यास तत्वत: मान्यता देण्यात येत आहे. तथापि याबाबत धोरणात्मक बाब म्हणून प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करावी. तसेच महत्वाची धरणे, महत्वाची बांधकामे यांच्यासाठी कायमस्वरुपी सुरक्षा आस्थापना स्थापनेसाठीचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

तसेच नव्याने बांधण्यात आलेल्या प्रकल्पांच्या देखभालीसाठी / सुरक्षिततेसाठी योजना बाह्य निधी मिळण्यासाठी नवीन लेखाशीर्ष (CERC Code) निर्माण होण्याचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

दरम्यानच्या काळात अति महत्वाची धरणे व बांधकामे यांची यादी मुख्य अभियंता स्तरावर निश्चित करुन त्यासाठी माजी सैनिकांच्या नोंदणीकृत संघटनेमधून खाजगी सुरक्षा यंत्रणे मार्फत सुरक्षा रक्षक घेण्यात यावेत व त्यासाठीचा खर्च आस्थापनेमधून उपलब्ध होणाऱ्या निधीतून करावा"

**ठराव क्रमांक ८७/६**

भूसंपादन अधिनियम १८९४ अनुसार खाजगी व्यवहाराने को.प.बंधारा मिरे तालुका माळशिरस, बुडीत क्षेत्राकरीता मौजे म्हाळुंग ता.माळशिरस येथील खरेदी केलेल्या जमिनीसाठी वाढीव मोबदला देण्याबाबत मा. मंत्री (कृखोपाम) यांचे स्तरावर तत्कालीन सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकारी (शा.अ./उ.अ/का.अ./अ.अ.) यांचे समवेत बैठक आयोजित करावी असे ठरले असल्याने या विषयी बैठकीत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही.

**ठराव क्रमांक ८७/७**

"ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळांतर्गत विविध परवानग्यांसाठी महामंडळाने निर्गमित केलेल्या दिनांक १२/०५/२००५ रोजीच्या परिपत्रकातील मंजूर दरांऐवजी, अशा विविध बाबींसाठी शासनाचे प्रचलित दर वापरण्याचा सविस्तर प्रस्ताव पुढील निर्णयार्थ शासनास सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ८७/८**

"ठराव करण्यांत येतो की, आंबेओहोळ मध्यम पाटबंधारे प्रकल्पाच्या (ता.आजरा, जि.कोल्हापूर) बुडित क्षेत्रातील मौजे उत्तूर, आर्दाळ, करपेवाडी, होन्याळी, हालेवाडी व वडकशिवाले या गावांच्या मंजूर निवाडयांमधून राहून गेलेल्या झाप/ खोप/ शेड/ विहीर / विंधनविहीर / पाईपलाइन / फळझाडे /वनझाडे/ मेसकाठी व बांबू इत्यादी बाबींची एकूण मोबदला

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

रक्कम रू. २.१३ कोटी सानुग्रह अनुदान म्हणून जलसंपदा विभागामार्फत प्रकल्पग्रस्तांना अदा करणेस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

**ठराव क्रमांक ८७/९**

"महामंडळाकडे ठेव अनुदान तत्वावर चालू असलेले कास धरण, सातारा याची उंची वाढविणेच्या कामासाठी आवश्यक असलेल्या वनजमिन, पर्यावरण, हेरीटेज स्ट्रक्चर या विषयीच्या अडचणी संपूर्णतया दूर झाल्यानंतर सदरचा विषय निर्णयार्थ नियामक मंडळात सादर करावा"

**ठराव क्रमांक ८७/१०**

"ठराव करण्यात येतो की, कृष्णानगर वसाहत ,सातारा येथील वनवासवाडी हद्दीतील गट क्र.१४ मधील २० आर विनावापर क्षेत्र मौजे खेड ग्रामपंचायतीस ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधण्यासाठी खालील अटींच्या अधीन राहून जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

अट : १) सदर जमिनीची शीघ्र सिद्ध गणकानुसार येणारी किंमत महामंडळास प्रथम जमा करावी.
२) जमिन ज्या उद्देशासाठी हस्तांतरीत केलेली आहे. त्या व्यतिरिक्त वेगळया कारणासाठी वापर करु नये.

**ठराव क्रमांक ८७/११**

"ठराव करण्यांत येतो की, खालील प्रमाणे विविध ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी कालव्यासाठी / धरणासाठी संपादित असलेल्या परंतु सध्या अतिरिक्त/विनावापर असलेल्या जागा वर्ग करण्याबाबत खालील अटींच्या अधिन राहून सदरच्या जागा जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे.

अटी: (१) जलसंपदा विभागाकडून पाणीवापराची रितसर परवानगी घेण्यात यावी,
(२) जिल्हाधिकारी यांचेकडून मालकी हक्काची निश्चिती करण्यात यावी,
(३) सदर जागेचे शासकीय मूल्य महामंडळास देण्यात यावे."

"मान्य"

| | |
|---|---|
| कार्यकारी संचालक<br>म.कृ.खो.वि.म, पुणे | मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)<br>व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे |

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८७ वी बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१४

| अ. क्र. | ग्रामपंचायत नळपाणी पुरवठा योजनेचे नांव | हस्तांतरीत करावयाचे अभिकरणाचे नांव | कायम स्वरूपी हस्तांतरण करावयाचे क्षेत्र (हेक्टर) | क्षेत्र हस्तांतरीत करावयाचे जिल्हाधिकारी कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | लोणी भापकर होळ प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना ता.बारामती जि. पुणे - साठवण तलावासाठी. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | २.८५ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| २ | ग्रामपंचायत वाणेवाडी, ता.बारामती, जि.पुणे -साठवण तलावासाठी | ग्रामपंचायत वाणेवाडी ता.बारामती, जि.पुणे | ०.४० हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ३ | तांदुळवाडी नळपाणी पुरवठा योजना ता.बारामती, जि.पुणे. - साठवण तलावासाठी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | २ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ४ | मुर्टी मोढवे प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना ता.बारामती, जि.पुणे. मौ.शेंडकरवाडी (करंजे पूल) -साठवण तलावासाठी. | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | १.६१ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ५ | ग्रामपंचायत चोपडज् अंतर्गत कानजवाडी व इतर वाड्यांकरिता नळपाणी पुरवठा योजना ता.बारामती जि.पुणे -विहिरीसाठी. | ग्रामपंचायत चोपडज् अंतर्गत कानजवाडी व इतर वाड्यांकरिता, ता.बारामती, जि.पुणे. | ०.०२ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ६ | मौ.कर्नलवाडी (गुळूंचे) ता.पुरंदर जि.पुणे पाणी पुरवठा योजना – विहिरीसाठी | मौ.कर्नलवाडी (गुळूंचे) ता.पुरंदर जि.पुणे | ०.०४ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ७ | थोपटेवाडी-लाटे ता.बारामती, जि.पुणे प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजना -साठवण तलावासाठी | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | ३.१९ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे |
| ८ | ग्रामपंचायत नांदवळ ता.कोरेगांव, जि.सातारा -विहिरीसाठी | ग्रामपंचायत नांदवळ ता.कोरेगांव, जि.सातारा | ०.०२ हेक्टर | जिल्हाधिकारी, सातारा. |

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८७ वी बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१४

| अ. क्र. | ग्रामपंचायत नळपाणी पुरवठा योजनेचे नांव | हस्तांतरीत करावयाचे अभिकरणाचे नांव | कायम स्वरूपी हस्तांतरण करावयाचे क्षेत्र (हेक्टर) | क्षेत्र हस्तांतरीत करावयाचे जिल्हाधिकारी कार्यालय |
|---|---|---|---|---|
| ९ | ग्रामपंचायत जांभुळवाडी-कोळेवाडी, ता.हवेली, जि.पुणे. | ग्रामपंचायत जांभुळवाडी-कोळेवाडी, ता.हवेली, जि.पुणे. | ०.०२ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे. |
| १० | ग्रामपंचायत,शिर्सुफळ,ता.बारामती, जि.पुणे. | ग्रामपंचायत, शिर्सुफळ, ता.बारामती, जि.पुणे. | ०.०२ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे. |
| ११ | ग्रामपंचायत कचरवाडी (निमगांव केतकी)ता.इंदापूर,जि.पुणे.-पाणी पुरवठा योजना करण्याकामी. | ग्रामपंचायत कचरवाडी (निमगांव केतकी) ता.इंदापूर, जि.पुणे. | ०.०१ हेक्टर | जिल्हाधिकारी, पुणे. |

**ठराव क्रमांक ८७/१२**

"ठराव करण्यात येतो की, जंगमहट्टी मध्यम प्रकल्प, ता.चंदगड, जि.कोल्हापूर या प्रकल्पांतर्गत बुडित क्षेत्रातील संपादित जमिनीतील मिळकत क्र. १२८ ते १३५ मधील घरांची मोबदला रक्कम रु.६,८०,३८५/- संबंधित शेतकऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अदा करण्यास नियामक मंडळाची मंजूरी देण्यांत येत आहे."

**ठराव क्रमांक ८७/१३**

"ठराव करण्यात येतो की, शासनाचे वित्त विभागाच्या 'महामंडळांकडील शिल्लक निधी बँकेत गुंतवताना सार्वजनिक उपक्रमांनी घ्यावयाची दक्षता' याबाबतच्या दि.२४.०७.२०१४ रोजीच्या परिपत्रकाचे नियामक मंडळाने अवलोकन केले आहे. त्यातील सूचनेनुसार महामंडळातील निधी बँकेत गुंतविण्याबाबत कार्यवाही करावी."

**ठराव क्रमांक ८७/१४**

"ठराव करण्यांत येतो की, केंद्र/राज्य शासनाच्या विविध स्त्रोतातून/ कार्यक्रमाद्वारे मंजूरी मिळालेल्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नगरपालिका/ ग्रामपंचायत यांचेकडून विहीर/पाण्याची टाकी / साठवण तलाव इत्यादी साठी मागणी केलेल्या जमीनी (जमीनीची शासकीय किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर) संबंधित नगरपालिका/ ग्रामपंचायत यांना देण्यासाठी संबंधीत जिल्हाधिकारी यांचेकडे वर्ग करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना मा.

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८७ वी बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१४

मंत्री जलसंपदा (कृखोपाम) तथा अध्यक्ष महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांचे मान्यतेने प्रदान करण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत महामंडळाच्या अधिनियमातील कलम ६३ मधील तरतूदीनुसार शासनाची पूर्व मान्यता घेण्यात यावी."

**ठराव क्रमांक ८७/१५**

"दूधगंगा एज्युकेशन ॲकॅडेमी इस्पुर्ली ता.करवीर जि.कोल्हापूर या संस्थेस दूधगंगा प्रकल्पांतर्गत इस्पुर्ली वसाहतीमधील वाढीव ९ विनावापर इमारती व १ गोडाऊन भाडेपट्टयाने देणेबाबतकोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

**ठराव क्रमांक ८७/१६**

"शिवप्रेरणा शिक्षक संस्था, उंब्रज यांना यांत्रिकी वसाहत, कोळवाडी, ता. जुन्नर येथील विनावापर असलेल्या २४ खोल्या ५ वर्षाकरिता ११ महिन्यांचे कराराने भाडेपट्टयाने देणेबाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

**ठराव क्रमांक ८७/१७**

"मौजे बेल्हे, ता. जुन्नर येथील पाटबंधारे वसाहतीमधील दोन खोल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इंदिरा नगर, बेल्हे, ता. जुन्नर या शाळेसाठी ५ वर्षाकरिता ११ महिन्याचे कराराने भाडेपट्टयाने देणे बाबत कोणताही ठराव पारीत करण्यात आला नाही."

**ठराव क्रमांक ८७/१८**

"ठराव करण्यांत येतो की, वडगांव बु।। ता.हवेली, जि. पुणे येथील पोलीस चौकी बांधणेसाठी स.नं.६१ मधील १०,००० चौ.फूट जागा चालू मूल्यांकनानुसार किंमत महामंडळास अदा करणेच्या अटीच्या अधिन राहून जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करण्यांस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक ८७/१९**

"ठराव करण्यात येतो की, दूधगंगा धरणाच्या बुडीत क्षेत्राबाहेरील गट क्र.५१, मधील १.३५ हे. व दूधगंगानगर वसाहतीमधील गट क्र. १५४, १५५, १६८ मधील ०.३७५ हे. अशी एकूण १.७२५ हे. जमीन कोल्हापूर महानगरपालिका,कोल्हापूर यांना पाणी पुरवठा योजनेसाठी प्रचलित दरानुसार भाडेतत्वावर देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

## महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११
## नियामक मंडळाची ८७ वी बैठक दिनांक १३ ऑगस्ट २०१४

**ठराव क्रमांक ८७/२०**

**"सन २०१२-१३ या वर्षाच्या महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या लेखा परीक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी दिनांक ३०/०५/२०१४ नुसार निर्गमित केलेला अलग लेखा परीक्षण अहवाल नियामक मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्याचे ठरल्यामुळे या विषयाबाबत कोणताही ठराव पारित करण्यात आला नाही."**

तद्नंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

"मान्य"

**(इंजि. शि. मा. उपासे)**
**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**(मा. ना. श्री. शशिकांत शिंदे)**
**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**